MHYA150009752024

दाखल तारीख : २५.०९.२०२४.

नोंदणी तारीख : २५.०९.२०२४.

निकाल तारीख : १६.०७.२०२६.

कालावधी : ०१ व., ०९ म., २१ दि.

## प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नेर, ता. नेर, जि. यवतमाळ.
## यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी : जी. सी. फुलझळके)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५४९/२०२४. निशाणी क्र.१५/लगत**

| | |
|---|---|
| प्रथम खबर क्रमांक | ५३५/२०२४. |
| अहवाल/गुन्हयाचा तपशील व पोलीस ठाणे | नेर पोलीस ठाणे, ता. नेर,<br>जि. यवतमाळ. |
| निकालाचा दिनांक | १६.०७.२०२६. |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र सरकारतर्फे, नेर पोलीस ठाणे. |
| अभियोग पक्षातर्फे वकील | श्री. एस. एन. वानखडे,<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **१. परमानंद देविदास जाधव,**<br>वय – ५१ वर्षे, व्यवसाय–मजुरी,<br>रा. तेलीपुरा नेर,<br>ता. नेर, जि. यवतमाळ.<br>**२. प्रताप शामराव स्थुल,**<br>वय – ५६ वर्षे, व्यवसाय–मजुरी, |

| | |
|---|---|
| | **३. दिलीप मारोती भोवते,**<br>वय – ६५ वर्षे, व्यवसाय–मजुरी,<br>**४. कवडू डोमाजी रामटेके,**<br>वय – ७४ वर्षे, व्यवसाय–मजुरी,<br>आरोपी क्र.२ ते ४ रा. कोहळा पुर्नवसन,<br>ता. नेर, जि. यवतमाळ. |
| आरोपींतर्फे वकील | श्री. एन. बी. वानखडे. |

**भाग 'ब'**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ४, परिच्छेद ४४ (ii)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ३१.०८.२०२४. |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | ३१.०८.२०२४. |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २५.०९.२०२४. |
| प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | २१.०४.२०२५. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २१.०४.२०२५. |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही |
| न्यायनिर्णय घोषित तारीख | १६.०७.२०२६. |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही |

मा. उच्च न्यायालाच्या दिनांक १४.०७.२०२२ रोजीच्या राजपत्राच्या
अधिसुचना क्र. ०८०१/२०२२ नुसार

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | परमानंद देविदास जाधव | -- | -- | महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२-अ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |
| २. | प्रताप शामराव स्थुल | -- | -- | महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२-अ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |
| ३. | दिलीप मारोती भोवते | -- | -- | महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कलम १२–अ | | | |
| ४. | कवडू डोमाजी रामटेके | –– | –– | महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

## न्यायनिर्णय

## (दिनांक १६.०७.२०२६ रोजी पारीत)

आरोपींविरुध्द निश्चित करण्यात आलेल्या महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ खालील दोषारोप सिध्दतेकरीता प्रस्तुत संपरीक्षा आहे.

### अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–

२. तक्रारदार दिनांक ३१.०८.२०२४ रोजी पोलिस स्टेशन नेर येथे कार्यरत असतांना गोपनीय बातमीदारामार्फत त्यांना बातमी मिळाली की, कोहळा पुर्नवसन येथे हनुमान मंदीरजवळ पिंपळाच्या झाडाखाली काही इसम सार्वजनिक ठिकाणी ५२ पत्याचा जुगार खेळत आहेत. सदर माहीतीवरुन तक्रारदार कोहळा पुर्नवसन येथे हनुमान मंदीरजवळ पिंपळाच्या झाडाजवळ सार्वजनिक ठिकाणी जाऊन छापा टाकला असता काही इसम ५२ पत्याचा जुगार खेळत असल्याचे दिसुन आले. सदर इसमांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव परमानंद जाधव, प्रताप स्थुल, दिलीप भोवते, कवडु रामटेके असे सांगितले. त्यांनी पंचासमक्ष आरोपींची अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ ५२ पत्याचे दोन सेट व नगदी रु.८७०/– असे मिळुन आले. आरोपींविरुध्द सदर प्रकरणात

गुन्हा क्रमांक ५३५/२०२४ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२–अ अन्वये नोंदविण्यात आला.

३. पोलीसांनी तपासा दरम्यान पंचासमक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केला. तक्रारदार यांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा आढळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपींविरुध्द निशाणी क्र.१५ वर महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२–अ अन्वये प्रतिकथन निश्चित केले. प्रतिकथन आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचुन दाखविले व समजुन सांगितले. आरोपींनी निश्चित केलेले प्रतिकथन अमान्य केले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | नागोराव बापुराव तलवारे – साक्षीदार क्र.१ | पंच साक्षीदार |
| २. | निलेश नानाजी सिरसाठ– साक्षीदार क्र.२ | तपासीक अमलदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास –**

| अनु. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| **अनु. क्र.** | **स्वरुप** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | पंचनामा. | १८. |
| २. | छापील प्रथम खबरी अहवाल. | २०. |
| ३. | तक्रार. | १९. |

**ब. बचाव पक्ष –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल –**

| **अ. क्र.** | **मुद्देमाल क्रमांक.** | **वर्णन.** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

५. साक्षीदारांच्या पुराव्यातुन आरोपींच्या विरोधात जाणारा पुरावा आढळुन आल्याने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे आरोपींचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र.१५ वर नोंदविण्यात आले आहे. संपरीक्षेदरम्यान अभियोग पक्षाने पंच साक्षीदार व तपासी अंमलदार यांना तपासले. अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी वकील श्री. एस. एन. वानखडे व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. एन. बी. वानखडे यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुरावा तसेच, दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेता, पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन आले, त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपी दिनांक ३१.०८.२०२४ रोजी १७.३० ते १८.०० वाजताच्या सुमारास, कोहळा पुर्नवसन नेर येथे हनुमान मंदीरजवळ मटका जुगार खेळण्याचे साहित्य जवळ बाळगुन स्वतःच्या फायद्यांकीरता लोकांकडुन पैसे घेवुन जुगार खेळवित असतांना मिळुन आले आणि त्याद्वारे आरोपी महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १२ (अ) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| २. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार नागोराव बापुराव तलवारे – साक्षीदार क्र.१ व तपासीक अंमलदार श्री. निलेश नानाजी सिरसाठ – साक्षीदार क्र.२ यांचा जबाब नोंदविण्यात आला.

**मुद्दा क्र.१ बाबत :–**

७. अभियोगपक्षातर्फे पंच नागोराव बापुराव तलवारे– साक्षीदार क्र.१ यांना तपासण्यात आले. सदर साक्षीदार यांनी नमुद केले की, त्यांना पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. त्यांना पंचनाम्यातील मजकुर माहिती नाही. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात देखील अभियोगपक्षास सहाय्यक असा कोणताही पुरावा प्राप्त झाला नाही.

८. अभियोग पक्षातर्फे तपासी अधिकारी निलेश नानाजी सिरसाठ – साक्षीदार क्र.२ यांचा पुरावा नोंदविण्यात आला. त्यांनी पुराव्यात असे नमुद केले की, ते दिनांक ३१.०८.२०२४ रोजी पोलिस स्टेशन नेर येथे कार्यरत होते. सदर दिवशी त्यांना गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळाली होती की, मौजे कोहळा पुर्नवसन येथील हनुमान मंदिराजवळ पिंपळाच्या झाडाखाली काही इसम जुगार खेळत आहेत. सदरच्या माहितीवरुन सदर साक्षीदार, त्यांचे सहकारी गजानन पत्रे, नरेंद्र सुर्यवंशी, सचिन डहाके व पंच असे मिळुण कोहळा पुर्नवसन येथील हनुमान मंदिराजवळ गेले. सदर साक्षीदार यांनी पुढे नमुद केले की, सदर ठीकाणी पाच–

सहा इसम एक्का बादशा जुगार खेळत असतांना दिसुन आले. सदर इसमांना त्यांनी पकडले व त्यांची विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव परमानंद जाधव, कवडु, भवते असे सांगितले. सदर साक्षीदार यांनी पुढे नमुद केले की, आरोपींच्या ताब्यात ५२ गंजीपत्ता साहित्य व रोख रक्कम ८८०/– रुपये मिळुण आले. सदर मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातुन पंचासमक्ष जप्त केला. सदर साक्षीदार यांनी पुढे नमुद केले की, त्यानंतर त्यांचे सहकारी श्री. पत्रे यांनी पंचनाम्याची कार्यवाही सदर साक्षीदारासमक्ष पुर्ण केले व त्यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सदर साक्षीदार यांनी नमुद केले. सदर साक्षीदार यांनी पुढे नमुद केले की, आरोपींना सुचनापत्रावर सोडण्यात आले. श्री. नरेंद्र सुर्यवंशी यांनी आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केल्याचे व त्यावर श्री. सुर्यवंशी यांची सही असल्याचे व त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सदर साक्षीदार यांनी नमुद केले. त्यांना दाखविण्यात आलेल्या प्रथम छापील खबरी अहवालावर श्री. सुर्यवंशी यांची सही असल्याचे व त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सदर साक्षीदार यांनी नमुद केले. प्रस्तुतच्या तक्रारीवरुन अपराध क्र.५३५/२०२४ नोंदविण्यात आला. सदर साक्षीदार यांनी प्रस्तुत प्रकरणात तपासकार्य पुर्ण केल्याचे सदर साक्षीदार यांनी नमुद केले.

९. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदार क्र.२ यांनी नमुद केले की, त्यांनी पंचाना लेखी सुचनापत्र दिले नव्हते. सदर साक्षीदार क्र.२ यांनी आरोपींतर्फे देण्यात आलेल्या इतर सुचना नाकारल्या.

१०. महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १२–अ प्रमाणे गुन्हा शाबित करण्याकामी आरोपी हे जुगार खेळतांना मिळुन आला व त्यांच्या ताब्यातुन मटका

जुगार खेळण्याकरिता आवश्यक साधने मिळुन आली व ती योग्यरित्या जप्त होणे आवश्यक आहे. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १०३ (४) नुसार किमान दोन स्वतंत्र साक्षीदारांच्या समक्ष सदरची जप्ती होवुन ती न्यायालयात शाबीत होणे आवश्यक अनिवार्य होते. सदर खटल्याकामी साक्षीदार क्र.१ व २ यांच्या पुराव्यामार्फत आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द होणे गरजेचे होते. पोलीस यंत्रणेने त्यासाठी मिळालेल्या बातमीनुसार प्रत्येक अनिवार्य प्रक्रिया पाळुन, त्यानुसार आवश्यक नोंदी करुन, घटनास्थळी जावुन, पंचा समक्ष पंचासह छापा टाकुन आरोपी हे ५२ पत्यांचा मटका जुगार खेळताना मिळुन आले व त्याकरिता आवश्यक साधने त्यांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आली ही संपुर्ण श्रृंखला न्यायालयापुढे शाबीत करायची असते.

११. आरोपींच्या ताब्यात कथीत मुद्देमाल मिळुन आल्याबाबत पंचानी कोणतेही कथन केले नाही. पंचनाम्याच्या कारवाईला इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदारांच्या पुराव्याची पुष्टी प्राप्त झालेली नाही. सबब, सदर पंचनाम्याबाबत संदेह निर्माण होतो.

१२. अभियोग पक्षाच्या कथनांनुसार, घटनास्थळ हे सार्वजनिक ठीकाण आहे, त्यामुळे साहजिकच इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध होवु शकला असता परंतु अभियोग पक्षातर्फे इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराला तपासण्यात आलेले नाही.

१३. आरोपी घटनास्थळी ५२ पत्याचा जुगार खेळत होते ही बाब सिध्द करण्याकरिता इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराला तपासण्यात आलेले नाही. इतर कोणत्याही साक्षीदारांच्या पुराव्याची पृष्ठी प्राप्त होवु शकलेली नाही. आरोपींनी

वर नमुद कायदयांतर्गत गुन्हा केल्याचा अभिलेखावर भक्कम व सबळ पुरावा उपलब्ध होवु शकलेला नाही.

१४. वरील सर्व बाबींचा एकत्रीत विचार करिता असे निदर्शनास येते की, आरोपी हे मटका जुगार खेळण्याचे साहित्य जवळ बाळगुन स्वतःच्या फायदया करीता लोकांकडुन पैसे घेवुन ५२ पत्ते जुगार खेळत असतांना मिळुन आले हे अभियोग पक्ष संपुर्ण संदेहाच्या पलीकडे जावुन सिध्द करु शकले नाही. त्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतात. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत** :-

१५. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये ८७०/- ही कोणीही मागितली नसल्यामुळे अपील कालावधीनंतर शासन जमा करणे योग्य व रास्त होईल. तसेच ५२ पत्ते गंजीपा मुद्देमाल मुल्यहीन असल्यामुळे सदर मुद्देमाल अपील कालावधीनंतर नाश करणे योग्य व रास्त होईल.

१६. प्रस्तुत प्रकरणातील तथ्य, अभिलेखावर सादर करण्यात आलेला पुरावा व वरील मुद्दयाचा विविचनोउत्तर निष्कर्ष विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ ते ४ यांना महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२-अ खालील दोषारोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रक्कम रूपये १५,०००/– प्रत्येकी वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

४. जप्त मुद्देमाल एकुण रक्कम रु.८७०/– ही अपील कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावी.

५. जप्त मुद्देमाल ५२ गंजीपा साहित्य हे निरर्थक व मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर त्यांचा नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2026.07.16 16:55:16 +0530

नेर, (जी. सी. फुलझळके)

दिनांक : १६.०७.२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नेर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are word to word as per original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : |
| Court Name | : Judicial Magistrate, First Class, Ner, Dist. Yavatmal. |
| Date | : 16.07.2026. |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 16.07.2026. |
| Judgment uploaded on | : 16.07.2026. |

....